RayatShikshanSanstha’s

# Mahatma PhuleMahavidyalaya, Pimpri, Pune

*Reaccredited with ‘A’ Grade by NAAC/ DST-FIST funded /An ISO 9001:2015 Certified College*
*Affiliated to SavitribaiPhule Pune University, Pune (PU/PN/ACS/053)*

## ‘Online transaction benefits and risks ’ (07/10/2021)

A lecture on this topic “Be careful while doing online transactions” was organized on 07/10/2021.Cyber expert Mr. Yogesh Thanage gave guidance on online transactions and also spoke on need of digital literacy.






सकाळ

**फ्री वायफायवरून पैसे पाठवताना रहा सावध : ठाणगे**

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**पिंपरी, ता. १२ :** ‘‘अलीकडे ‘वायफाय एटीएम कार्ड’चा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. सहजपणे आपल्या खिशातील कार्डमधूनही वायफायमुळे पैसे काढले जाऊ शकतात. त्यामुळे आयएफआयटी प्रतिबंधक पाकिटाचा वापर करावा. परिणामी पैसे सुरक्षित राहतील,’’ असा सल्ला सायबरतज्ज्ञ योगेश ठाणगे यांनी उपस्थितांना दिला.

‘सकाळ’च्या नेटवर्क थिन आणि जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘सायबर सुरक्षा जनजागृती अभियान’ राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ‘ऑनलाइन व्यवहार करताय? रहा सावध’ या विषयावर ठाणगे यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले.

**योगेश ठाणगे**

ठाणगे म्हणाले, ‘‘मोठ्या शहरापासून ते ग्रामीण भागापर्यंत मोठ्या प्रमाणात ऑनलाइन व्यवहार सुरू आहेत. ऑनलाइन व्यवहार करताना कोणीही ‘फ्री वायफाय’चा वापर करू नये. बसस्टॉप, बाजारपेठेमधील अनोळखी वायफाय कनेक्ट करून व्यवहार करू शकते. यातून तुमची माहिती चोरीला जाण्याची दाट शक्यता असते. अलीकडे ‘वायफाय एटीएम कार्ड’ आपण वापरत आहोत. आपल्या खिशातील कार्डमधून वायफायमुळे पैसे काढले जाऊ शकतात. त्यामुळे आरएफआयडी प्रतिबंधक पाकिटाचा वापर करावा, जेणेकरून कोणालाही पैसे काढता येणार नाहीत. ऑनलाइन व्यवहार करताना आपला पिन कोणालाही सांगू नये, पिन टाकताना दुसऱ्या हाताने झाकून नंबर टाकावा. मोबाईलवरून पैसे ट्रान्स्फर करताना यूटीआय सर्व्हिसचा वापर करावा. ऑनलाइन व्यवहारांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे, कारण जिथे व्यवहार होतात तिथेच गुन्हेगार जास्त प्रमाणात तयार होतात, त्यामुळे आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.’’

या वेळी बाबूरावजी घोलप महाविद्यालयाचे प्राचार्य नितीन घोरपडे, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड, संघवी केशरी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन आहेर, प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे प्राचार्य सदाशिव कांबळे, ज्ञानवर्धिनी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य बी. जी. पानमंद, राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक पाटील आदी उपस्थितीत होते. या प्रसंगी उपस्थितांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. प्रा. संदीप नन्नवरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ज्ञानेश्वर जांभूळकर यांनी आभार मानले. प्रा. अभिषेक आकणकर, डॉ. स्वाती वाघ, प्रा. दीपक पडवे यांनी कार्यक्रम नियोजनात पुढाकार घेतला.

Pune, PCMC-Today1
13/10/2021 Page No. 4

Programme Officer
National Service Scheme
Mahatma Phule College,
Pimpri,Pune -17.

Principal,
Mahatma Phule Mahavidyalaya,
Pimpri Pune-17